# स्पर्धेचे निकष व नियम

## मानसिक क्षमता आणि माहिती विश्लेषण – स्पर्धा 2025

## (Mental Ability and Data Analysis" Competition 2025)

## आयोजक जिल्हा – अमरावती

**1. स्पर्धेचे स्तर: स्पर्धा 3 स्तरात होईल:**

- **तालुकास्तर:** क्लस्टर लेव्हलमधील प्रथम क्रमांक मिळवणारे शिक्षक तालुकास्तरावर सहभागी होतील.
- **विभाग स्तर:** तालुकास्तरावरील विजेते विभाग स्तरावर सहभागी होतील.
- **राज्य स्तर:** विभागस्तरावरील विजेते राज्य पातळीवर स्पर्धा करतील.

**स्पर्धेचे स्वरूप – लेखी चाचणी स्वरुपात (offline पद्धतीने) ठरविलेल्या चाचणी केंद्र स्थळी**

**1. चाचणीत खालील घटकावर आधारित प्रश्न असतील:**

- **विभाग अ - Data Analysis**
- **विभाग ब - Mental Ability**
- **विभाग क - Problem Solving**

**2. प्रश्नांचा प्रकार:** बहुपर्यायी प्रश्न (MCQs) स्वरुपाची चाचणी असेल.

**3. नियोजन:**

| अ.क्र. | चाचणी स्तर | चाचणीचा कालावधी | प्रश्न संख्या | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| 1 | तालुकास्तर | 60 मिनिटे | 50 | 100 |
| 2 | विभाग स्तर | 90 मिनिटे | 75 | 150 |
| 3 | राज्य स्तर | 120 मिनिटे | 100 | 200 |

- प्रश्नपत्रिका PDF (PASSWORD PROTECTED) स्वरुपात सर्व जिल्ह्या करिता तालुका व विभाग स्तरावरील स्पर्धे करिता आयोजक जिल्ह्याकडून उपलब्ध करून दिल्या जातील. संबंधित जिल्हे स्पर्धकांच्या संख्येनुसार त्याच्या प्रिंट काढून चाचणीचे आयोजन करतील.
- चाचणी संपूर्ण ठिकाणी एकाच दिवशी व एकाच वेळेत आयोजित केली जाईल.

## नियम व अटी:

1. **पात्रता:**
    - 1 ली ते 12 वी ला शिकवणारे शिक्षक/ मुख्याध्यापक सहभागी होऊ शकतात.
    - शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख ते अधिकारी व कर्मचारी सहभागी होऊ शकतात.

2. **स्पर्धेचे टप्पे:**
    - तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावणारे विभागस्तरावर पात्र असतील. (प्रथम क्रमांकावर एकापेक्षा जास्त सारखे गुण मिळविणारे स्पर्धक असतील तर त्यापैकी एक निवडायची प्रक्रिया तालुकास्तरीय समिती राबवेल.)
    - विभागस्तरावर गुणानुक्रमे प्रथम 5 स्पर्धक निवडले जातील.
    - राज्यस्तरावर गुणानुक्रमे प्रथम 10 स्पर्धक निवडले जातील.
3. **प्रश्नांचा दर्जा:**
    - प्रश्नपत्रिकेचा काठीण्यपातळी स्तरनिहायवाढत जाईल.
    - प्रश्नपत्रिका गोपनीय ठेवली जाईल.
    - प्रश्नपत्रिका PDF व उत्तर सूची (PASSWORD PROTECTED) स्वरुपात सर्व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला स्पर्धेच्या आधी तालुकास्तरीय व विभाग स्तरावरील स्पर्धे करिता आयोजक (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,अमरावती) जिल्ह्याकडून उपलब्ध करून दिल्या जातील.
4. **गैरप्रकार टाळण्यासाठी पर्यवेक्षकांची नियुक्ती (सर्व स्तरावर) चाचणीच्या ठिकाणी करण्यात यावी.**

## मुल्यमापन व निकाल:

- तज्ञ परीक्षक मंडळातर्फे उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन.
- चाचणी ज्या दिवशी असेल त्याच दिवशी चाचणी झाल्या नंतर पुरविण्यात आलेल्या उत्तर सूची नुसार सर्व उपस्थित स्पर्धकांच्या सोडविलेल्या चाचणीचे मुल्यांकन करतील.
- मूल्यांकनात त्या तालुक्याचा प्रथम विजेता यांचे नाव संबंधित जिल्ह्याच्या DIET ला तालुका समिती मार्फत कळविले जाईल व संबंधित DIET या स्पर्धेची '**विभागस्तरीय स्पर्धा**' जो जिल्हा आयोजित करीत असेल त्यांना कळवेल.
- संबंधित विभाग '**विभागस्तरीय स्पर्धाचे आयोजन करून** मूल्यांकनात विभागातून गुणानुक्रमे प्रथम ५ स्पर्धकांची नावे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,अमरावती यांना पाठवितील.
- सदर चाचणी मध्ये **Negative Marking पद्धत वापरली जाईल.** <u>(प्रत्येक सोडविलेल्या चुकीच्या प्रश्नासाठी 1 गुण वजा केला जाईल.)</u>

- <u>**सर्व स्तरावर (तालुका,विभाग व राज्य) स्पर्धेत सहभागी काही स्पर्धकांना प्रथम क्रमांकाचे जर सारखे गुण मिळाले असतील तर ज्या स्पर्धकाला चाचणीतील विभाग क - Problem Solving मध्ये सर्वात जास्त गुण असतील त्या स्पर्धकाला प्रथम समजण्यात येईल.**</u>

## पुरस्कार व सन्मान:

- **विजेते स्पर्धकांना सन्मानपत्र:** संबंधित DIET प्रदान करतील
- **राज्यस्तरीय स्पर्धेची प्रमाणपत्र:** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,अमरावती द्वारा दिली जातील.

## संभाव्य वेळापत्रक :

- **तालुकास्तर : 29 नोव्हेंबर 2025 शनिवार वेळ – दुपारी 12 ते 1**
- **विभागस्तर :** डिसेंबर 2025 चवथा शनिवार
- **राज्यस्तर :** जानेवारी 2025 चवथा शनिवार